# हसती दुनिया (मराठी)

मूल्य ₹ १५/-

अंक १ • वर्ष १५ वे • पृष्ठे ५२ • जानेवारी - २०१८



# हसती दुनिया (मराठी)

**बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट**

**अंक १ • वर्ष १५ वे • पृष्ठे ५२ • जानेवारी २०१८**

संपादक
राजेंद्र थोरात

सहसंपादक
सुरेश तिर्लोटकर

सजावट व चित्रे
उदय सत्यवान पांगे
राजनंदन पिंपळकर


संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेज-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल
marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

| वर्गणी | १ वर्ष | ५ वर्षे |
|---|---|---|
| भारत/ नेपाळ | रु. १५०/- | रु. ७००/- |
| यु.के. | £ 15 | £ 80 |
| युरोप | € 20 | € 100 |
| अमेरिका | $ 25 | $ 120 |
| कनाडा/ ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 140 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९





## कथा


- रावण-कुबेर युध्द ०६
- शब्दांची जादू ०८
- भगवान १४
- संस्कृती ४४
- खोट्याच्या माथी सोटा ४८




## स्तंभ


- दोन शब्द ०४
- शब्दकोडे १०
- दादाला विचारु या ११
- विचारपुष्प १२
- आरोग्याचा मंत्र २४
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे २८
- दिव्यवाणी ३०
- हसा मुलांनो हसा ३२
- सामान्य ज्ञान ४६
- चित्र काढा आणि रंग भरा ५०


## विशेष व प्रेरक प्रसंग



- त्याग व समर्पण ०५
- व्यक्तिविशेष ०७
- तेजस्विनी -६९ २०
- शौर्यगाथा २१
- दुर्गभ्रमंती २२
- निरनिराळ्या कॅलेंडर्सच्या.. ३१
- समर्थ दर्शन -३९ ३४
- कलामांची भाषणे ४२
- ब्राह्मोसचा सुखोईतून... ४५
- पक्षी जगत ४७





## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३६


## कविता


- हसती दुनिया ०९
- प्रजासत्ताक दिन २९
- क्रांतिज्योती ३५

# दर्जेदार साहित्य वाचावे

सुप्रसिद्ध लेखक व विचारवंत जॉन रस्किन यांच्या जीवनातील ही गोष्ट आहे. एका विद्यापीठात त्यांचे व्याख्यान ठेवले होते. त्याचे व्याख्यान ऐकण्यासाठी सभागृह अगदी तुडुंब भरुन गेले होते. पण ऐन वेळी जाहीर करण्यात आले, की आज रस्किन यांचे व्याख्यान होणार नाही. उद्या याच वेळी या ठिकाणी त्यांचे व्याख्यान होणार आहे. दुसऱ्या दिवशी परत लोक जमले. मात्र आदल्यादिवसापेक्षा लोकांची गर्दी कमी होती. दुसऱ्या दिवशीही तशीच घोषणा करण्यात आली. लोक परत गेले. तिसऱ्या दिवशी पुन्हा लोक त्या ठिकाणी व्याख्यान ऐकण्यासाठी जमले. यावेळी मात्र दुसऱ्या दिवसापेक्षा लोकांची संख्या कमी होती. तिसऱ्या दिवशीही तशीच घोषणा करण्यात आली. चौथ्या दिवशी पुन्हा लोक जमले पण यावेळी मात्र सभागृह बरेच रिकामे होते. केवळ तीस-पस्तीस श्रोते व्याख्यानाला हजर होते. रस्किन व्यासपीठावर आले आणि म्हणाले, मित्रांनो, गर्दीचा लोंढा आज ओसरलेला आहे. व्याख्यानाला आज जे हजर आहेत, ते खरे जिज्ञासू आणि रसिक आहेत. आपली ऐकण्याची तळमळ पाहावी म्हणून मी मुद्दामच व्याख्यान पुढे ढकलत होतो. आज मात्र मी आपणाशी मनसोक्त बोलणार आहे.

त्या दिवशी रस्किन यांचे व्याख्यान खूपच रंगले. श्रोत्यांनीही भरभरुन आनंद घेतला. जीवनातील अनेक रहस्ये ऐकून श्रोते धन्य झाले.

याच जॉन रस्किन याचे 'अन टू द लास्ट' हे पुस्तक वाचून महात्मा गांधीजी खूपच प्रभावित झाले होते. त्यांच्या या पुस्तकाचा गांधीजींच्या जीवनावर फारच प्रभाव पडला. त्यांनी या पुस्तकाचा 'सर्वोदय' या नावाने सुरेख अनुवादही केला.

सांगण्याचा भावार्थ हाच आहे, की शेकडो निरर्थक गोष्टी ऐकण्यापेक्षा किंवा वाचण्यापेक्षा थोर पुरुषांच्या, विचारवंतांच्या, संत-महात्म्यांच्या गोष्टी ऐकण्यात आणि वाचण्यातच आपले हित आहे. संत निरंकारी मिशनच्या माध्यमातूनही बालकांसाठी 'हसती दुनिया' मासिकाच्या रुपाने दर्जेदार वैचारिक खाद्य देण्याचा अल्पसा प्रयत्न सातत्याने केला जातो. या बरोबरच महाराष्ट्राच्या प्रादेशिक संत समागमप्रसंगी काही संस्कारक्षम साहित्यही प्रकाशित केले जाते. छोट्या गोष्टी मोठे बोध, संस्कारधन, संस्कारदीप या पुस्तकांसोबतच या वर्षी संत समागमात 'बालविकासाच्या दिशेने' हे अनुवादित पुस्तक आपल्या भेटीस येत आहे. व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत या पुस्तकाचा फार मोठा हातभार लागणार यात शंकाच नाही. बालविकास की ओर या मूळ हिंदी पुस्तकांचे हे आगळे-वेगळे भाषांतरीत सोप्या भाषेत, मनोरंजक पद्धतीची मांडणी असलेले अतिशय अल्प दरात (रु. पंधरा फक्त) आपल्याला उपलब्ध होणार आहे. ही मराठी वाचकांसाठी खास पर्वणी आहे. मायबाप वाचकांनी त्यांचा अवश्य लाभ घ्यावा, न जाणो जीवनात आवश्यक असलेले कितीतरी पैलू त्यात गवसतील!

- राजेंद्र थोरात

विशेष



# त्याग व समर्पण

कटकमध्ये जानकीनाथ बोस हे एक वकील होते. एका रात्री ते, त्यांची पत्नी व मुलगा सुभाष आपल्या घरात झोपले असता काही वेळाने त्यांच्या पत्नीला जाग आली व तिने पाहिले, की आपला मुलगा सुभाष जमिनीवर झोपला आहे. त्याला थंडी वाजेल अशी तिला भिती वाटू लागली. पत्नीने मुलाला जागे केले व विचारले, "बेटा सुभाष! तुला असे जमिनीवर का झोपावेसे वाटले." सुभाषने उत्तर दिले, "आई आपले पूर्वज असणारे साधू-संत, महात्मे, ऋषीमुनी हे सारेच जमिनीवर झोपत असत, म्हणून मीही जमिनीवर झोपणार आहे." आई म्हणाली, "बेटा ते महान होते आणि वयानेही मोठे होते. तुझे वय जमिनीची कठोरता सहन करणार नाही. तू बिछान्यावर येऊन झोप." आई आणि मुलाच्या चर्चेने जानकीनाथ बोस जागे झाले आणि त्यांनीही सुभाषला विचारले, "सुभाष तुला जमिनीवर झोपायला कुणी शिकविले?" सुभाष म्हणाला, "बाबा, गुरुजी सांगत होते साधू-संत, महात्मे, ऋषीमुनी हे सारेच महापुरुष होते. तसेच ते जमिनीवर झोपत असून मीही जमिनीवर झोपणार आहे. मला महापुरुष व्हायचे आहे."

जानकीनाथ बोसनी सुभाषला समजावले, "बेटा, जमिनीवर झोपून कुणी महान होत नसतात तर कठोर तप, साधना आणि समाजसेवेतून व्यक्ती महान होते. आचरणात शुध्दता ठेवली तर मनुष्य महान होतो." सुभाषला वडिलांचे म्हणणे पटले व त्याने त्याप्रमाणे वर्तन ठेवले. त्यातूनच एक महान क्रांतिकारी हिंदुस्थानला लाभला त्याचे नाव सुभाषचंद्र बोस. राष्ट्रासाठी संपूर्ण जीवन व्यतीत करुन, समर्पण कसे असावे याचा संदेश देणारे जीवन ते जगले व वडिलांची शिकवण आचरणात आणली.

मित्रांनो, त्याग व समर्पण यातूनच देशहित जपलं जातं. यासाठी आई वडीलव त्यांची शिकवण यांचा आदर राखला पाहिजे.

# रावण - कुबेर युध्द

कुंभकर्णाला झोपेचे वरदान लाभल्यामुळे रावणाने त्याच्यासाठी एक भव्य गुहा शोधून तेथे शयनघर बनवले. भव्य पलंग व सर्व सुविधा असलेली ती प्रचंड गुहा कुंभकर्णाचं शयनकक्ष बनलं. कुंभकर्ण झोपल्यानंतर रावणाच्या अत्याचारी वृत्तीला मर्यादा राहिली नाही. त्याने देव, यक्ष, गंधर्व तसेच तपश्चर्या करणाऱ्या ऋषी-मुनींना त्रस्त करुन सोडले. तेव्हा कुबेराने त्याला निरोप पाठवला, "बंधुराज रावणा, तू धर्माच्या मार्गाने चालत राहा. तुझ्या अन्याय अत्याचाराच्या कथा ऐकून मला तुझी चिंता वाटू लागलीय. देवादिकांना, ऋषी-मुनींना त्रास देऊन तू स्वत:चा विनाश मात्र ओढवून घेत आहेस." कुबेराचा निरोप ऐकून रावण अधिकच क्रोधित झाला. त्याने रागाच्या भरात दूताचे तलवारीने तुकडे करुन राक्षसांना खायला घातले. कुबेर आपला भाऊ असला तरी त्याला चांगलाच धडा शिकवायचा असा त्याने निर्धार केला.

रावण मोठ्या सैन्यदलासह कैलासपर्वतावरील कुबेराच्या नगरीत चाल करुन गेला. रावणाच्या राक्षससैन्याला तोंड देण्यासाठी कुबेरानेही आपली यक्षसेना सज्ज केली. रावणाने गदेने यक्षसेनेला घायाळ करीत यक्षपुरीत प्रवेश केला. मात्र तेथे यक्ष द्वारपालाने त्याला अडवले. पण ब्रह्मदेवाचे वरदान असल्याने रावणाला काहीच झाले नाही. संतप्त रावणाने प्रवेशद्वाराचा खांब उपटून यक्ष द्वारापालावर प्रहार करुन त्याला ठार केले. रावणाचा पराक्रम पाहून काही यक्ष भयभीत होऊन पळून गेले. रावणाचा नि:पात करण्यासाठी कुबेराने मणिभद्र नावाच्या आपल्या वीराला पाठवले. त्याचे आणि रावणाचे तुंबळ युध्द झाले. मणिभद्राने रावणाचे दोन पराक्रमी सेनानी मारीच आणि धूम्राक्ष यांना जखमी केले. त्यामुळे चवताळलेला रावण मणिभद्रावर धावून गेला. रावणाच्या गदाप्रहाराने मणिभद्र जखमी झाला व आपला जीव वाचवत रणभूमीपासून दूर निघून गेला.

नंतर मात्र स्वत: कुबेर युध्दाच्या मैदानात उतरला. रावणाला त्याने समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण रावण बधला नाही. त्याने कुबेरावर अग्नेय अस्त्राचा मारा केला. त्यावर प्रतिउत्तर म्हणून कुबेराने वरुण अस्त्राचा वापर करुन त्याचे अस्त्र शांत केले. बराच वेळ अस्त्र-शस्त्राचा मारा करुनही कुबेर पराभूत होत नाही हे पाहिल्यावर रावणाने राक्षसी मायेचा वापर करायला सुरुवात केली. वाघ, डुक्कर, हत्ती, पर्वत अशी नाना रुपे घेऊन तो कुबेरावर धाऊन गेला; पण कुबेरापुढे त्याचे काही चालले नाही. शेवटी अदृश्य होऊन गुप्तरुपाने त्याने कुबेराच्या मस्तकावर गदेचा प्रहार केला. घायाळ झालेला कुबेर एखाद्या वटवृक्षासारखा खाली कोसळला. देवांनी व यक्षांनी त्याला रणभूमीवरुन उचलून नंदनवनात नेले. तेथे त्याला शुध्दीवर आणले. कुबेरावर विजय मिळवल्याच्या उन्मादाने रावण नाचू लागला. त्याने कुबेराचे पुष्पक विमान बळजबरीने पळवून नेले आणि विजय चिन्ह म्हणून लंकेत मिरवले.

❍ क्रमश:

# डॉ. लीला दीक्षित

बालसाहित्य हे संस्कारक्षमच असलं पाहिजे, असा काहीसा गैरसमज मराठीत रुढ झाला आहे. परिणामी बालसाहित्यातून सातत्याने उपदेशाचे डोस पाजण्याचं काम बालसाहित्य लिहिणाऱ्या लेखकांनी नित्यनेमाने केलं. मात्र मुलांवर संस्कार करतानाच, त्यांचं भावविश्व जाणून त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे, हे लीला दीक्षित यांच्यासारख्या मोजक्याच बालसाहित्यकारांना जमलं. त्यांनी नेहमी मुलांशी संवाद हाच आपला ध्यास मानला. त्यामुळेच पोपटाचं झाड, बहाद्दर बल्लू, गाणारं झाड पंझ नवे, गंमत गाव, नाच रे मोरया, मुके मित्र ही लीला दीक्षितांची पुस्तके म्हणजे लहानांसाठी कायम जपून ठेवावा, असा ठेवा बनली. त्यांच्या पुस्तकातला निसर्ग तर मुलांचा मित्रच बनून गेला. ही किमया त्यांनी साधली, ती कोकणातल्या गुहागरसारख्या निसर्गरम्य गावी त्यांचा जन्म झाल्यामुळेच. बालपणी अनुभवलेला कोकणातला निसर्ग, त्यांच्या पुस्तकांच्या केंद्रस्थानी उतरला आणि कायमचा लहानांचा होऊन गेला. छोट्यांसाठी लिहिताना एक काळजी घ्यावी लागते, त्यांच्याच वयाचं होऊन लिहावं लागतं. बालकथा लिहिणारा प्रत्यक्षात वयाने मोठा असला तरी लिहिणाऱ्याचं कल्पनाविश्व बालवाचकांचं असावं लागतं, तरच बाललेखक आणि बालवाचकांचा मेळ जमतो.

लीला दीक्षित आणि बालवाचकांचा असा मेळ कायमच जमला. मात्र लहान मुलांसाठी लेखन हेच लीला दीक्षितांचं कर्तृत्व नाही.

त्यांचा एकूण आयुष्यपटच स्तिमित करणारा आहे. वयाच्या १८ व्या वर्षी लग्न होऊन त्या पुण्यात आल्या. नंतर त्यांनी एम.ए., पीएच.डी. पर्यंतचं शिक्षण घेतलं. पुण्यातच एस.एन.डी.टी महाविद्यालयात त्या मराठीच्या प्राध्यापक म्हणून रुजू झाल्या. मराठी हा अभ्यासाचा आणि आस्थेचा विषय असल्यामुळेच त्यांनी बालसाहित्याव्यतिरिक्तही विविध विषयांवर संशोधनपर लेखन केलं आहे. दहा समाजसुधारकांची रसाळ चरित्रं त्यांनी लिहिली असून प्राचीन मराठी साहित्यातील स्त्रीचे दर्शन या त्यांच्या वाङ्.मयनिर्मितीला पुरस्कारही मिळालेला आहे. असं असलं, तरी मुलांचं भावविश्व हेच त्यांनी आपलं कार्यक्षेत्र मानल्यामुळे बालसाहित्यकार हीच त्यांची ओळख बनली. बालसाहित्यातील त्यांचं कार्य लक्षात घेऊनच परभणीला झालेल्या अखिल भारतीय बालसाहित्य संमेलनाचं अध्यक्षपद त्यांना मानाने बहाल करण्यात आलं होतं. आज वयाची ८० पूर्ण केल्यावरही, आपल्याकडून अजून चांगलं बालसाहित्य निर्माण व्हावे, हीच आस त्या बाळगून आहेत.

❒ : साभार



कथा

# शब्दांची जादू

जुन्या काळची गोष्ट आहे. एक व्यापारी आपला व्यापारउदीम आटोपून आपल्या गावी निघाला होता. वाटेत एके ठिकाणी तो विश्रांतीसाठी थांबला. तेथील विहिरीच्या काठावर मोहरांची थैली ठेवून हातपाय धूत असताना चुकून धक्का लागून थैली विहिरीत पडली. सर्व कमाई विहिरीत पडलेली पाहून तो व्यापारी फार दु:खी झाला व तिथेच शोक करीत बसला.

तेथून जाणाऱ्या भैरु शेतकऱ्याने त्याला विचारले, "काय झाले? इतके दु:खी का?" व्यापारी म्हणाला, "माझी सारी कमाई विहिरीत पडली. मी साफ बुडालो. आता काय करु?"

भैरुने विचारले, "मी जर विहिरीतील थैली काढली तर मला काय द्याल?" अगदी वैतागलेला व्यापारी म्हणाला, "विहिरीत बुडालेली थैली कसली बाहेर निघणार? जर तुला काढता आली तर तूच तुला पाहिजे तेवढ्या

मोहरा मला दे.”

हे ऐकताच भैरुने पटकन विहिरीत उडी मारली. तळाशी जाऊन मोहरांची थैली शोधली व वर घेऊन आला. व्यापाऱ्याला खूप आनंद झाला. पण भैरुने थैली उघडून त्यातील ५०० मोहरांपैकी ५० मोहरा व्यापाऱ्याला दिल्या व बाकीच्या घेऊन तो चालू लागला. ते पाहून व्यापारी संतापला. त्याने भैरुला अडवले. दोघांचे भांडण सुरु झाले. भैरु म्हणाला, “तूच म्हणालास की तुला पाहिजे तेवढ्या मोहरा मला दे. आता का भांडतोस ?”

अखेर ते भांडण पाटलाकडे गेले. पाटलाने दोघांचे म्हणणे ऐकून घेतले. तो भैरुला म्हणाला, “व्यापारी तुला काय म्हणाला होता ?” व्यापारी म्हणाला, “तुला पाहिजे तेवढ्या मोहरा मला दे.” भैरुने उत्तर दिले. “मग तुला किती मोहरा पाहिजेत ?” पाटलाने पुन्हा भैरुला विचारले. “मला साडेचारशे मोहरा पाहिजेत म्हणून मी त्याला पन्नास मोहरा दिल्या.” भैरुने सांगितले.

“इथेच तू चुकलास” पाटील शांतपणे म्हणाला. “तुला पाहिजेत तेवढ्या मोहरा मला दे असे व्यापाऱ्याने सांगितले होते. साडेचारशे मोहरा तू या व्यापाऱ्याला दिल्या पाहिजेत, ठरल्याप्रमाणे.” पाटील दरडावून म्हणाला. आपण शब्दात पकडले गेलो हे भैरुने ओळखले. मुकाट्याने साडेचारशे मोहरा त्या व्यापाऱ्याला देऊन टाकल्या. आनंदीत झालेल्या व्यापाऱ्याने पाटलाला मन:पूर्वक धन्यवाद दिले व तो खुशीत घरच्या वाटेला लागला.

तात्पर्य : बोलताना, शब्द देताना नेहमी विचार करुनच बोलावे.

❑❑❑

# हसती दुनिया

मुखपृष्ठाची सजावट छान
हसती दुनियेची वाढवी शान

दोन शब्दात दडला अर्थ
नका घालवू जीवन व्यर्थ
शब्दकोडे ध्यानी आले
सामान्यज्ञान जागे झाले
विचारपुष्पात भरलं ज्ञान

सुंदर सुंदर बोधकथा
आवडती त्या चित्रकथा
भरभरुन हसा - हसवा
रंगाने सुंदर चित्र रंगवा
आहे हसती दुनिया छान

वाढदिवस साजरा करिती
पाहून फोटो मुले हर्षती
अपुल्या मित्रांना दाखविती
संतांचे आशिष लाभती
हे संत असती महान



- छाया दलाल (किल्लारी)

# शब्दकोडे

# १६२

○ विकास अरोडा (रेवाडी-हरियाणा)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | ■ | ४ |
| | ■ | | ■ | ५ | ६ | |
| | ■ | ७ | | ■ | | ■ |
| ८ | | | ■ | ९ | | १० |
| | ■ | ■ | ११ | | ■ | |
| ■ | १२ | | ■ | | ■ | |
| ■ | | ■ | १३ | | १४ | |
| १५ | | | | ■ | | ■ |

## आडवे शब्द

१. विदर्भातील एक जिल्हा, येथे आहे मेळघाट अभयारण्य (औरंगाबाद/अमरावती)
५. जगातील सगळ्यात मोठे वाळवंट
७. भगावन श्रीकृष्ण रुक्मिणीचे नात्याने .... होते ?
८. गव्हाची पोळी
९. पतीचे / पत्नीचे वडील
११. एक पांडव, हिडिम्बाचा पती
१२. दीर्घायुष्याचा आशीर्वाद - आयुष्यमान ......
१३. क्षेत्रफळानुसार भारताचा सर्वात मोठा केंद्रशासित प्रदेश ......... आणि निकोबार बेट आहे.
१५. त्रेतायुगाच्या आधीचे युग

## उभे शब्द

१. सर्वात कमी लोकसंख्येची घनता असणारे भारतीय राज्य : ......... प्रदेश
२. मुख्य निवडणूक आयुक्ताची नियुक्ती कोण करतो ?
३. भारतीय हुतात्मा दिन जानेवारी महिन्याच्या ..... तारखेला साजरा करतात.
४. 'पायोजी मैंने रामरतन धन पायो' ही भक्तीरचना संत ........ बाई यांची आहे.
६. महाराष्ट्र, बापू, रसमलई या शब्दांच्या द्वितीय अक्षरापासून बनणारा प्रसिध्द आंबा
९. चार वेद : ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद आणि ........
१० एक राज्य ज्याची राजधानी जयपूर आहे.
१२. भगवान श्रीरामांच्या पादुका सिंहासनावर ठेवून ..... याने अयोध्येचे राज्य सांभाळले.
१३. दुर्योधनाने मित्र म्हणून कर्णाला या देशाचा राजा बनवले.
१४. महाभारतातील राजा पांडूची द्वितीय पत्नी.

उत्तरे इतरत्र

# दादाला विचारु या

**प्रश्न : जर परमात्मा चेतन सत्ता आहे तर मग आपण चुकीचे काम करताना तो आम्हाला त्यापासून परावृत्त का करत नाही?**

**उत्तर :** ऊर्जा किंवा शक्ती स्वतः कोणतेही काम करीत नाही हे आजच्या वैज्ञानिकांनी सिध्द केले आहे. मात्र सर्व कामे तिच्याद्वारेच होत असतात. ऊर्जेबरोबर जे उपकरण जोडले जाते ते उपकरण आपले काम करते. जसे वीज एक ऊर्जा आहे. ती स्वतः काहीच करत नाही. परंतु तिचे कनेक्शन हिटरला दिले तर तो उष्णता देईल आणि कुलरला किंवा एअर कंडिशन मशीनला जोडले तर थंड हवा देईल, गारवा देईल. हा थंडपणा, उष्णता किंवा प्रकाश यांचा संबंध वीजेशी नसून तिला जोडलेल्या उपकरणांशी संबंधित आहे. ही उपकरणे वीजेवरच चालतात; परंतु त्यांच्या कार्यामध्ये वीज कोणताही हस्तक्षेप करत नाही. वीजप्रवाह सर्वांमध्ये एकच आहे. आपणाला असे वाटेल, की जर वीजेने उष्णता दिली तर थंडपणा देण्यास का नकार द्यावा? असे होऊ शकत नाही. अशाचप्रकारे ही चेतन सत्ता आपले कार्य करत असते. ती स्वतः काहीच करत नाही. त्या सत्तेशी जे जीवरुपी उपकरण जोडले जाते त्या उपकरणातील गुणधर्म मन, बुध्दी, चित्त, अहंकार यांच्याद्वारे प्रगट होत असतात. ही चेतन सत्ताच जीवाला शक्ती प्रदान करीत असते; परंतु आपल्या गुणधर्माप्रमाणे तो (जीव) स्वतंत्रपणे कर्म करीत असतो. त्याच्या कार्यामध्ये ही चेतन सत्ता कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करीत नाही. जीव जसे कर्म करतो तसे फळ निराकार परमात्म्याच्या विधानानुसार भोगतो. इश्वरीय विधानांतर्गत कर्म करण्याचे स्वातंत्र्य दिलेले असल्यामुळे ही सत्ता आपण जे काम करतो मग ते चुकीचे असो किंवा बरोबर असो आपल्याला काहीही करताना परावृत्त करत नाही.

**प्रश्न : भक्ती केल्यामुळे माणसाला कोणती शक्ती मिळते?**

**उत्तर :** भक्तीमुळे सर्वप्रथम व्यक्तीची मानसिकता सकारात्मक होते. भक्ती माणसाला हीन किंवा दीन बनवित नाही. भक्तीमुळे माणसाला अशी शक्ती मिळते, की मनुष्य संसारातील कोणत्याही आपत्तीशी, संकटाशी सामना करु शकतो. मग ती शारीरिक असो किंवा नैसर्गिक असो, प्रापंचिक चढ-उतार, दु:ख, कष्ट या सर्वांशी आनंदाने सामना करण्याचे सामर्थ्य भक्तीमुळे प्राप्त होते. ईश्वराचा भक्त नेहमी ईश्वरी इच्छेचा आनंदाने स्वीकार करतो. कोणत्याही प्रकारचा हर्ष-विशाद त्याला बाधा आणू शकत नाही. एकंदरीत भक्तीमुळे माणसाला सर्वप्रकारची शक्ती प्राप्त होते.

❑❑❑

विचारपुष्प



# सद्गुरु वचनामृत

## निराकार - प्रभुला प्राधान्य द्या

सत्संगामध्ये जे प्रेम, भक्तीभाव दिसत आहे तो केवळ इथपर्यंतच मर्यादित न राहता समाजामध्ये आणि संपूर्ण विश्वामध्ये पाहायला मिळावा. सत्संग एखाद्या आरशाप्रमाणे असतो. आरशासमोर उभे राहिल्यानंतर आरसा आपला चेहरा आणि कपड्यांवरचे डाग काहीही न बोलता जसेच्या तसे दाखवतो. तसे सत्संगात आपल्यामध्ये असणाऱ्या कमतरता जाणवतात. जे ज्ञानप्राप्तीनंतर आदेशाप्रमाणे आपलं जीवन बनवतात त्यांचं जीवन सुंदर होते. ज्ञान-कर्माच्या संगमानेच जीवनाचा शृंगार होईल!

ज्ञान प्राप्त केल्यानंतरही ज्ञानाच्या विपरित कर्म केले, मनमानी करत राहिल्यास जीवनात दु:ख येणारच त्यात ज्ञानाचा काय दोष? जसे,

आपण प्रकाशात चालत राहिलो तर ठेच न लागता व्यवस्थित चालू शकतो; पण जर प्रकाशातही डोळे झाकून चालू लागलो तर ठेच लागल्यापासून आपल्याला कोणीही वाचवू शकणार नाही.

आपण जीवनात महत्त्व प्रथम निराकार प्रभुला द्यायचे आहे. हे संपूर्ण विश्व आपला परिवार आहे. कारण, आपण सारे या निराकार प्रभुची संतान आहोत. त्यामुळे कधीही कोणाविषयी वाईट चिंतू नये. कोणाचं वाईट करु नये. सर्वांशी प्रेम-नम्रतेने वागायचं आहे.

Life becomes beautiful if we stop looking for flaws and negativity अर्थात आपण जर नकारात्मक भावनेने कुणाचे दोष, चुका शोधत राहिलो तर आपण सहजजीवन-आनंदमय जीवन जगू शकत नाही. या संकुचित-नकारात्मक भावनेच्या पलीकडे गेलो तर आपला प्रत्येक क्षण सुंदर होईल.

गाडीच्या इंजिनाला एकेक भाग जोडलेला असतो. प्रत्येक भाग आपापल्या विशिष्ट ठिकाणी कार्यरत असतो. जर ब्रेक म्हणाला, की मी एक्सीलेटरच्या जागी जाणार, गीअर म्हणतील आम्ही स्टेअरिंग व्हीलच्या जागेवर जाऊ असे अडून बसले तर अशाने गाडी सुरळीत चालण्याऐवजी नुकसानच होईल. जर अडून बसायचे असेल तर निराकाराच्या ज्ञानावर अडून बसावे. अशाचप्रकारे आपण सारे मिळून मिसळून राहिलो, आदेश-उपदेशांवर अंमलबजावणी करत जीवन जगलो तर जीवन नक्कीच सुंदर होईल.

## निराकाराशी दृढतेने जोडून राहावे

जीवनात विश्वास खूप गरजेचा आहे. मनात दृढ विश्वास ठेवून निराकाराशी नेहमी दृढतेने जोडून रहावे. निराकारावर आपला जितका विश्वास वाढेल, तितके आपण पूर्ण गुरसिख बनू शकतो. जस-जसे आपण निराकाराप्रति समर्पित होतो, तस-तसा आपल्या मनामध्ये सकारात्मक भाव येतो. पूर्ण समर्पण आपल्या स्वभावात यायलाच हवे. जेव्हा एक कोष समर्पित होतो तेव्हा तो किती सुंदर फुलपाखराचं रुप धारण करतो. फुलपाखरु सुरुवातीला एक अंड्याच्या स्वरुपात असते, तेव्हा त्याच्या आजूबाजूला केवळ अंधारच असतो. त्या अवस्थेत ते आपल्या भविष्याविषयी पूर्णपणे अनभिज्ञ असते; परंतु समर्पित झाल्यावर मात्र त्याचं सुंदर फुलपाखरात रुपांतर होते.

महापुरुष स्वत:वर नव्हे, तर या निराकारावर विश्वास ठेवतात. ते जाणतात, की निराकारालाच माहीत आहे, की आपलं कल्याण कशामध्ये आहे आणि आपल्याला शांती कशी मिळेल. ते नेहमी समर्पित भावनेने राहतात म्हणून त्यांच्या मनात शांती असते. निराकाराशी पूर्णत: जोडल्यानेच मनात शांतीची अवस्था येते. महापुरुष या ईश्वरीय भावनेने नेहमी निराकाराशी जोडलेले राहतात आणि शांततापूर्वक जीवन व्यतीत करतात.

**- सद्‌गुरु माता सविंदर हरदेवजी**



कथा

# भगवान

एका खेडेगावात एक भुरटा चोर होता त्याचे नाव मात्र भगवान होते. म्हणतात ना- नाव मोठे लक्षण खोटे. पण करणार काय जशी संगत तशी रंगत. उनाड पोरांच्या नादी लागल्याने तो शाळेत गेला नाही. त्यामुळे अशिक्षित राहिला. वयात आल्यावर आईवडिलांनी त्याचे लग्न लावून दिले. काम ना धंदा, इकडे तिकडे फिरुन दिवस काढायचा. रात्री घरी यायचे असे बरेच दिवस गेले. आईवडिलांना वाटले होते पोराचे लग्न करुन दिल्यानंतर तरी तो सुधरेल आणि काही तरी काम-धाम करेल.

शेवटी आईबाप थकले आणि काही निमित्त होऊन दोघेही मरण पावले. आता भगवानवर मोठाच प्रसंग आला. आता करायचे काय? त्याला काहीच सुचेना. विचार करता-करता

त्याला एक शॉर्टकट सुचला. त्याने विचार केला, आपण रात्री गावात छोटीमोठी चोरी करावी. त्याप्रमाणे त्याने चोरी करण्यास सुरुवात केली. तो दररोज रात्री गावातील सर्व लोक झोपले की कोणाच्याही घराजवळ जे काही मिळेल ते घेऊन यायचा. दुसऱ्या दिवशी सकाळीच शहराच्या ठिकाणी जाऊन विकायचा. त्यातून जे काही मिळेल ते घरात आणून द्यायचा.

एक दिवस असाच रात्रीच्या वेळी चोरी करायला निघाला. पण त्याला काही मिळाले नाही. वैतागून तो गावात असलेल्या शंकराच्या मंदिरात गेला. देवाच्या मूर्तीसमोर जाऊन प्रार्थना करु लागला, की हे देवा! मी संपूर्ण रात्रभर फिरुन सुध्दा मला काही मिळाले नाही. तू सर्वांना देणारा आहेस. माझ्यावर कृपा कर. मला काहीतरी वस्तू मिळू दे. आज काही मिळाले नाही तर माझी बायको मुलं उपाशी राहतील. असा विचार करता करता त्याची नजर वर लोंबकळत असलेल्या घंटेकडे गेली. परंतु घंटा हाताला येण्यासारखी नव्हती.

पुन्हा त्याने शंकराला प्रार्थना केली, की हे भोळ्या शंकरा! घंटा उंचावर आहे. तुझ्या पिंडीवर पाय ठेवून ही घंटा मी काढतो. मला क्षामा कर. त्याप्रमाणे त्याने भगवान शंकरांच्या पिंडीवर पाय ठेवला आणि घंटेला हात घातला. इतक्यात स्वयं शंकर तेथे प्रकट झाले. हा प्रकार पाहून भगवान घाबरला.

भगवान शंकर म्हणाले, अरे भगवान, मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. कारण चोरी करण्याच्या हेतूने का होईना तू मला तुझे सर्व शरीर समर्पित केले आहेस. लोक बेलपत्र, तुळस नेवैद्य अर्पण करतात. तू तर स्वत:लाच अर्पण केले आहेस. तुला जे पाहिजे ते माग. त्यावर भगवान म्हणाला, 'हे देवा! माझ्यासारख्या चोराला तू प्रसन्न झालास हे माझे भाग्य आहे. मी नाईलाज म्हणून चोरी करत होतो. माझे सर्व गुन्हे माफ कर आणि माझे जीवन मला सुख-शांतीपूर्ण जगता येईल असा आशीर्वाद दे.'

भगवान शंकर म्हणाले, "देवळाबाहेर बसलेल्या अंध-अपंग भिकाऱ्यांकडे पहा. त्यांचा नाईलाज आहे म्हणून ते भिक्षा मागतात; पण तुला तर मी धडधाकट बनवून पाठवले आहे. हा देह सत्कारणी लाव. दिवसातून एकदा तरी परोपकार कर.

गरजूंना, अडलेल्यांना यथाशक्ती मदत कर. अरे, मीच त्यांच्या रुपाने सेवा करुन घेतो. माझी केलेली ही सेवा कधीच व्यर्थ जात नाही. पानं, फुलं, फळं यांनी मी प्रसन्न होत नाही. परोपकारी भक्तांची तर मी स्वत: चाकरी करतो. लक्षात ठेव, नर सेवा हीच नारायण पूजा आहे."

एवढे बोलून भगवान शंकर अंतर्धान पावले. दुसऱ्या दिवसापासून भगवानचे परोपकाराचे व्रत सुरु झाले. तो प्रत्येकाला मदत करु लागला. पाहता-पाहता त्याची कीर्ती सर्वत्र पसरली. धनाढ्य लोक त्याच्याकडे विश्वासाने धन-धान्य सोपवू लागले. ते सारे धन तो परोपकारात लावी. अशाप्रकारे एक भुरटा चोर असलेला भगवान लोकांच्या हृदयात 'भगवान' बनून राहिला.

❒❒❒

*चित्रांकन : दीपक मेहरा (दिल्ली)*

*चित्रांकन -रंग : अजय कालडा*

# आजोबा





झाडांना काळजी वाटू लागली.
आता काय करायचं आजोबा ?
तुम्ही काळजी करु नका. बिनादांड्याच्या कुऱ्हाडीने तो आपले काहीच बिघडवू शकत नाही.
लाकूडतोड्याजवळ असलेल्या बिना दांड्याच्या कुऱ्हाडीने त्याने झाड तोडण्याचा भरपूर प्रयत्न केला परंतु त्याचा काहीच उपयोग झाला नाही.
ओ हो... बिना दांड्याच्या कुऱ्हाडीचे घाव घालून मी तर फार थकून गेलो आहे. एवढी मोठी झाडं आता मी कशी तोडू ?
बघूया, एकटं लोखंड आपलं काय बिघडवतं ते.


मी या कुऱ्हाडीने एवढं मोठं झाड तोडू शकत नाही; मला काहीतरी दुसरा उपाय शोधला पाहिजे.
आजोबा! तो पहा परत जात आहे. तुम्ही बरोबर बोलला होतात, की एकटा तो आपलं काहीच वाईट करु शकत नाही.
दुसऱ्या दिवशी लाकूडतोड्याला एक युक्ती सुचली.
जर मी या कुऱ्हाडीला दांडा घातला तर आपलं काम सोपं होईल.


आजोबा, तो पहा लाकूडतोड्या पुन्हा येत आहे.
त्याने त्याच्या कुऱ्हाडीला आता दांडा घातला आहे.
हो! आता आपण वाचू शकत नाही, कारण आपल्यातील एक दांडा त्याला फितूर झाला आहे.
अरे देवा! ह्या एका लाकडी दांड्याने आम्हा सर्वांना मारले.
लोखंडाच्या कुऱ्हाडीला जर लाकडी दांडा नसता तर झाड कापण्यापासून वाचले असते.
शेवटी झाडाचे एक लाकूडच झाडाचे वैरी बनले. जोपर्यंत लोखंडाला लाकडाची मदत मिळाली नाही तोपर्यंत कुऱ्हाड झाडाला तोडू शकली नाही. झाडाचा एक अंश लोखंडाला जाऊन मिळाला आणि अधोगती झाली. त्या लाकडाने 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' असे काम केले. आता झाडं कशी वाचणार? अशाचप्रकारे आपल्या समाजाला व देशाला घरातीलच लोकांकडून अधिक धोका असतो.
तात्पर्य, फंदफितुरीनेच कुळाचा नाश होत असतो.

# एका जिद्दीचा प्रवास : सुनीता धोटे

नागपूरच्या सुनीता धोटे या सायकलिंग आणि जलतरणाच्या खेळाडू आहेत. नागपूर ते पाँडेचरी हे तब्ब्ल एक हजार ४१२ किमीचे अंतर सायकलिंग करत एकटीने पूर्ण करण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. राज्यस्तरीय वरिष्ठ जलतरण स्पर्धेत त्यांनी सुवर्णपदक प्राप्त केले आहे. लग्नानंतर आणि चाळीशीकडे वाटचाल करीत असताना सुनीता यांनी हे यश मिळवले आहे. सुनीता या मूळच्या खेळाडू. त्यांचे वडील भारतीय हवाई दलात होते. त्यामुळे शाळेत असताना कधी कानपूर तर कधी खरगपूर असा त्यांचा देशभर प्रवास सुरु होता. या भटकंतीमुळे त्यांचे शिक्षणही चार ठिकाणी झाले. मात्र हे सगळे करताना शालेय वयात एकच गोष्ट सुटली नाही आणि ती म्हणजे खेळ. उंच उडी हा त्यांचा आवडता खेळ आणि त्यात त्यांनी राष्ट्रीय चॅम्पियनशीपदेखील मिळवली. कदाचित तेव्हा खेळातील कारकीर्द सुरु राहिली असती, पण वडिलांची इच्छा वेगळी होती. मुलीने शिक्षणाकडे लक्ष द्यावे, असा आग्रह त्यांनी धरला आणि सुनीता यांनी तो मानला.

पदवीचे शिक्षण, मग एमबीए, आयसीडब्ल्यूए असा सगळा शिक्षणाचा यशस्वी प्रवास केला. नोकरीचा संघर्ष, लग्न, नोकरीतील स्थिरस्थावरता आणि मुले असे सगळे त्यांनीही अनुभवले. या सगळ्यात एवढा मोठा खंड पडलेला, की पुन्हा खेळणे जमेल की नाही याची शाश्वती नाही. पण मनाने पक्के केले होते, खेळायचे. खेळ निवडला डायव्हिंग. मुलांना डायव्हिंग जमत होते पण सुनीताला नाही. पाण्यावर चुकीच्या पध्दतीने पडल्याने मारही लागत होता. अशावेळी त्यांचा लहान मुलगा मदतीला धावला. त्याने आईला जमिनीवर कोलांटउड्या मारायला लावल्या. अशा अथक मेहनतीतून डायव्हिंग जमायला लागले आणि मग त्यात इतकी प्रगती झाली, की २०१४ च्या राज्यस्तरीय मास्टर्स स्पर्धेत त्यांनी सुवर्णपदक मिळवण्यापर्यंत मजल मारली. याचवेळी सायकलिंगशी गाठ पडली. रोज सराव करता करता सुनीता सायकलिंगच्या प्रेमात पडल्या. मुळात साहसी खेळांची आवड असलेल्या सुनीता यांनी एकटीने सायकलिंग एक्स्पीडिशन करण्याचा निश्चय केला. नोव्हेंबर २०१४ मध्ये त्यांनी नागपूर ते पाँडेचरी या प्रवासाला प्रारंभ केला. स्वच्छ भारत संकल्पनेचा प्रसार करण्याचे उद्दिष्ट ठरवून या लांब पल्ल्याच्या, कठीण प्रवासाला सुरुवात झाली.

आताचा पल्ला होता एक हजार ४१२ किमीचा आणि तोही एकटीने पार करावयाचा होता. एका क्षणी तर त्यांच्यातील उत्साह आणि शक्ती पारच तळाला गेली. कशासाठी सायकलिंग करत शेकडो किलोमीटर जायचे असा प्रश्न मनात येत होता. निराशेतच त्यांनी घरी फोन केला. फोनवर मुलगा म्हणाला, आई, तुझा प्रयत्न करत राहण्यावर विश्वास आहे आणि तू प्रयत्न कर. तेवढ्याने त्यांना धीर आला आणि न थकता सुनीता यांनी सायकलिंग पुढे सुरु ठेवले. शेवटच्या तीन दिवसात तर सतत पाऊस होता. पण जराही न डगमगता त्यांनी पाँडेचरी गाठले. तब्बल सहा दिवस एकटीने सर्व अडचणींचा सामना करत त्यांनी त्यांचे लक्ष पूर्ण

# परमवीर कॅप्टन विक्रम बत्रा

पाकिस्तानशी भारताचे झालेले तिसरे युध्द म्हणजे कारगील युध्द. १९९९ मध्ये झालेल्या या युध्दात ऑपरेशन विजय कामगिरीसाठी कॅप्टन विक्रम बत्रा यांची निवड करण्यात आली होती. पॉईंट क्र. ५१४० वर आक्रमण करत असताना त्यांनी जे शौर्य गाजवलं त्याला तोड नाही.

९ सप्टेंबर १९७४ रोजी जन्मलेले विक्रम बत्रा हिमाचल प्रदेशातील पालमपूर येथे राहणारे. १९९६ मध्ये ते सेनेत भर्ती झाले. २० जून १९९९ रोजी कॅप्टन बत्रा आपल्या सैन्याची तुकडी घेऊन पॉइंट क्र. ५१४० वर पोहचले. आपल्या सैनिकांमध्ये उत्साह निर्माण करत ते शत्रूसैन्यावर तुटून पडले. पाहता-पाहता त्याने शत्रूला माघार घ्यायला भाग पाडले.

७ जुलै १९९९ रोजी कॅप्टन विक्रम बत्रा यांना पॉइंट क्र.४८७५ च्या कामगिरीवर पाठवण्यात आले. हे ठिकाण पाकिस्तानातील अतिशय बलाढ्य ठिकाण म्हणून ओळखलं जातं. येथे जाण्यासाठी अरुंद आणि अवघड वाट आहे. शत्रूसैन्य ठिकठिकाणी दबा धरुन बसलेले होते. अशा ठिकाणी कॅप्टन बत्रा यांनी वेगळ्या वाटेने जायचे ठरवले. आपल्या तुकडीला योग्य त्या सूचना देत त्यांचा उत्साह वाढवत त्यांनी अचानक हल्ला चढवला. त्यात शत्रूसैन्याचे पाच शिपाई गारद झाले; परंतु या हल्ल्यात कॅप्टन बत्रादेखील घायाळ झाले होते. शत्रूसैन्याची व्यूहरचना भेदून जायचे होते. घायाळ अवस्थेत असूनही ते रांगत रांगत पुढे सरकत राहिले आणि अशक्य वाटणारा विजय त्यांनी शक्य करुन दाखवला. त्यांचे जखमांनी भरलेलं शरीर रक्ताने न्हाऊन निघाले होते. त्यांच्याकडे पाहून त्यांच्या सैनिकांमध्ये उत्साह चढला आणि पॉइंट क्र.४८७५ त्यांनी सर केले.

परंतु या धुमश्चक्रीत ते लढता-लढता वीरगतीस प्राप्त झाले. मरणोपरांत त्यांना परमवीर चक्र अर्पण करुन गौरविण्यात आले.

❑❑❑

केले. सर्वाधिक लांबीचे सायकलिंग एक्स्पीडिशन पूर्ण करणारी महिला म्हणून त्यांचा एशिया बुक ऑफ रेकॉर्डस् मध्ये समावेश झाला.

मास्टर्स डायव्हिंग स्पर्धेत त्या मागील तीन वर्षांपासून राष्ट्रीय चॅम्पियन आहेत. कॅनडातील मॉंट्रिएल येथे झालेल्या फिना जागतिक जलतरण स्पर्धेतही त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले. २०१५ मध्ये हैदराबाद येथे ट्रायथ्लॉन स्पर्धा पूर्ण करण्याचा मान सुनीता यांनी मिळवला. मानद डॉक्टरेट मिळालेल्या सुनीता यांनी रिटेल बँकिंग विषयात पीएच.डी. मिळवली आहे. नागपुरातील महाविद्यालयात त्या आंतरप्रेनरशीप या विषयाच्या प्राध्यापक आहेत. कोणताही खेळाडू मोठा होतो त्या मागे तो किंवा ती विचार कसे करतात याला फार महत्त्व असते. कोणतीही कठीण गोष्ट तुम्ही हाती घेता तेव्हा काहीजण मनोबल खच्ची करायला बघतात. त्यावेळी तुम्ही तुमच्या निश्चयावर ठाम राहिले पाहिजे. दुसऱ्याशी तुलना करुन किंवा स्पर्धा करुन कुणीही मोठा होऊ शकत नाही. स्वत:शीच स्पर्धा करणे आणि आपल्या क्षमता विकसित करत राहणे, हेच यशाचे सूत्र असल्याचे सुनीता मानतात. अवयवदानाबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी त्या प्रयत्न करतात.

❑❑❑

# अंतूर किल्ला


अजंठा-सातमाळा या सह्याद्रीच्या पूर्वपश्चिम उपरांगेवर मोक्याच्या ठिकाणी अंतुरगड ठाण मांडून बसलेला आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यामध्ये अंतुरगड किल्ला आहे. या भक्कम आणि बलदंड किल्ल्याची उभारणी एका मराठा सरदाराने केली होती. पुढे हा किल्ला अहमदनगरच्या निजामशाहीच्या ताब्यात होता. मलीक अंबरच्या काळात येथे काही बांधकामे झाली. पुढे मोगल वावटळीत हा किल्ला मोगलांच्या ताब्यात गेला. इंग्रजांनी इतर किल्ल्याबरोबर याचाही ताबा पुढे मिळवला.

अंतुरच्या पूर्व अंगाला असणाऱ्या कड्याच्या पोटात दक्षिणेकडे तोंड करुन हा दरवाजा आहे. अरुंद जागेत दरवाजा असल्यामुळे तो समोर गेल्याशिवाय चटकन दिसत नाही. येथे दरवाजाच्या बाहेर पहारेकऱ्यांच्या जागा आहेत. काही वर्षांपूर्वीपर्यंत (१९९० पर्यंत) या दरवाजाला लाकडी दारे होती. ती आता बेपत्ता झाली आहेत. या दारातून आत गेल्यावर आतील मार्ग तटबंदीने बंदिस्त केलेला असून तो अरुंद आहे. या मार्गावर वरुन खूपच दगडी पडलेल्या आहेत. पुढचा दरवाजा मात्र पूर्व दिशेला तोंड करुन आहे. हा भव्य दरवाजा आहे. हा दरवाजा ओलांडून पुढे गेल्यावर तिसरा दरवाजा आहे. दुसऱ्या दरवाजाच्या आतील बाजूच्या कमानीवर शिल्पे आहेत. अशी शिल्पे अनेक ठिकाणी पहायला मिळतात. पण येथे या शिल्पाबरोबर सजावटीसाठी तोफेचे चार गोळे वापरले आहेत. अशाप्रकारे केलेली सजावट महाराष्ट्रात किंवा महाराष्ट्राबाहेरही आढळत नाही. ही वैशिष्ट्यपूर्ण सजावट पाहून आपण तिसऱ्या दारावरील भव्य असा फारशी शिलालेख अवलोकन करुन गड प्रवेश करायचा. आपला प्रवेश गडाच्या मध्यभागीच होतो.

गड दक्षिणोत्तर पसरलेला असून तटबंदीने वेष्टीत आहे. या तटबंदीच्या कडेने आपण उत्तर टोकाकडे चालू लागतो. उजवीकडील



तटबंदीमध्ये काही बुरुज आहेत. डावीकडे एक टेकडी असून टेकडीच्या दक्षिण बाजूला भलामोठा तलाव आहे. टेकडीच्या उतारावर भव्य इमारत आहे. टेकडीच्या माथ्यावर टेहाळणीकरिता भलामोठा चौथरा बांधलेला असून त्यावर चढण्यासाठी उत्तरेकडून पायऱ्या आहेत. या चौथऱ्यावरुन संपूर्ण गडावर लक्ष ठेवता येते तसेच येथून अजंठा-सातमाळा रांगेचे उत्तम दर्शन होते. उत्तरेकडील खानदेशाचा परिसर न्याहाळता येतो. गडाचा दक्षिण भाग एका तटबंदीने वेगळा केलेला आहे. या तटबंदीमध्ये तीन दरवाजे आहेत. त्यापैकी मध्यभागी मोठा दरवाजा असून त्याला दक्षिण बाजूला दोन मोठे बुरुज आहेत. मधल्या टेकडीच्या पश्चिम उतारावर तटबंदीजवळ पाण्याचे टाके कोरलेले आहे. गडाचा उत्तर भाग बालेकिल्ल्यासारखा असून तो अधिकच भक्कम करण्यात आला आहे. खंदकाच्या माथ्यावर भक्कम तटबंदी असून या तटबंदीला चिलखती बांधणी आहे. एक तोफही इथे पडलेली आहे.




❑❑❑

## वाचकांचे मनोगत

आामच्या वाचकांच्या मागणीनुसार व आवडीनुसार आमच्या ग्रंथालयामध्ये हसती दुनिया हे मासिक लावले आहे. आमच्या सर्व वाचकांना आपले मासिक फार आवडले आहे. त्यामुळे आमचे वाचनप्रेमी त्याबद्दल आमच्याजवळ आपल्या मासिकाचीच तारीफ करत असतात.

ते म्हणतात, हे मासिक फक्त मुलांसाठीच नसून ते लहानांपासून वयोवृध्दांपर्यंत सर्वांसाठी आहे. कारण त्यामध्ये ज्या बोधकथा आहेत त्यातून चांगला बोध मिळतो. मुलांवर सुध्दा त्याचे चांगले परिणाम होत आहेत. शाळेत जाणाऱ्या मुलांसाठी हे तर फार महत्वाचे मार्गदर्शक आहे. या मासिकामुळे बरीच शाळकरी मुले उत्कृष्ट वक्तृत्व स्पर्धेत भाग घेऊन एक वेगळीच छाप पाडतात. शालोपयोगी अशा अनेक गोष्टी त्यामध्ये आहेत.

आपल्या सर्व संपादक विभागाचे धन्यवाद!

**- मीरा थोरात (सोयगांव-औरंगाबाद)**

# निरोगी आयुष्यासाठी काही टिप्स


१) सकाळी उठून रोज २-३ ग्लास कोमट पाणी प्यावे तसेच ते खाली बसून घोट-घोट प्यावे.
२) सकाळचा नाश्ता सूर्य उगवल्यानंतर अडीच तासापर्यंत कधीही करु शकता.
३) सकाळच्या जेवणासोबत नेहमी ज्यूस प्यावे.
४) दुपारच्या जेवणासोबत नेहमी लस्सी किंवा ताक प्यावे.
५) रात्रीच्या जेवणासोबत नेहमी दूध प्यावे.
६) रात्रीच्या वेळी कधीही आंबट फळे खाऊ नयेत.
७) शक्यतो आईस्क्रीम खाणे टाळावे.
८) फ्रिजमधून काढलेले पदार्थ किमान १ तासानंतर गरम करुन खावेत.
९) तयार झालेले जेवण कमीत कमी ४० मिनिटात खावे.
१०) दुपारी पोटभरुन जेऊ नये. पोटात थोडी भूक असू द्यावी.
११) रात्रीचे जेवण सूर्य मावळण्याआधी करावे.
१२) जेवण करण्याअगोदर कमीत कमी ४८ मिनिटे अगोदर पाणी प्यावे.
१३) सकाळी जेवण केल्यानंतर काम करावे.
१४) दुपारच्या जेवणानंतर काही वेळ विश्रांती करावी.
१५) रात्री जेवण केल्यानंतर कमीत कमी ५०० मीटरचा एक फेरफटका जरुर मारावा.
१६) जेवण केल्यानंतर नेहमी वज्रासन करावे. किमान ५ ते १० मिनिटे
१७) रात्री निदान ९ ते १० वाजेपर्यंत झोपावे.
१८) जेवण कधीही पोट भरुन करु नये. थोडी भूक नेहमी ठेवावी.
१९) रात्री कधीही सॅलेड खाऊ नये.
२०) जेवण नेहमी खाली जमिनीवर बसून व व्यवस्थित चावून खावे.
२१) दुधात नेहमी हळद टाकून प्यावे.
२२) आयुर्वेद चिकित्सा पध्दती आरोग्यासाठी नेहमी चांगली आहे.
२३) पहाटे सूर्य उगवण्याच्या दीड तास आधी उठावे.
२४) उठल्यानंतर हाता-पायाच्या हालचाली कराव्या.

❑❑❑

# आसन : अर्ध मत्स्येन्द्रासन

अर्ध म्हणजे अर्धे. म्हणजे हे अर्धे आसन आहे. हठयोगाच्या साधकांनी ज्यांना हे आसन सर्वप्रथम शिकवले. त्या मत्स्येन्द्रानाथाच्या नावावरुन या आसनास मत्स्येन्द्रासन हे नाव पडले. हे मत्स्येन्द्रानाथ भगवान शंकराचे शिष्य होते, असे समजते.

**कृती :** उजवा पाय गुडघ्यात दुमडून त्या पायाची टाच गुदद्वार आणि वृषणामध्ये म्हणजेच शिवणीस घट्ट चिकटून ठेवा. टाच तेथून हलू देऊ नये. नंतर डावा पाय गुडघ्यात वाकवा आणि डाव्या पायांचा घोटा उजव्या पायाच्या गुडघ्याजवळ येईल अशाप्रकारे ठेवा. उभ्या वाकलेल्या डाव्या गुडघ्यावर उजव्या हाताची बगल ठेकवा. नंतर गुडघ्याला अशाप्रकारे मागे सरकवा, की त्याचा स्पर्श आता बगलेच्या मागील भागाला होईल. आता उजव्या हाताने डाव्या पायाचा अंगठा पकडा. मग उजव्या खांद्याच्या सांध्यावर भार देऊन पाठीचा कणा डाव्या बाजूला जितका वळवता येईल तितका वळवा. चेहरादेखील डाव्या बाजूला जितका वळवता येईल तितका वळवा. चेहरा शक्यतो डाव्या खांद्याच्या रेषेत आणा. यानंतर डावा हात पाठीच्या मागून नेऊन त्याने उजव्या पायाची मांडी धरा. पाठीचा कणा अगदी ताठ ठेवा. पाच ते पंधरा सेकंदापर्यंत या स्थितीत राहा. याप्रमाणे पाठीच्या कण्याला उजव्या बाजूलाही वळवता येते.




## फायदे :

- या आसनामुळे पाठीचा कणा दोन्ही अंगांना पिळला जाऊन बळकट होतो.
- या आसनामुळे जठराग्नी प्रदीप्त होऊन पचनक्रिया सुधारते.
- हे आसन कुंडलिनीस जागृत करते आणि चंद्रनाडीस स्थिर करते.
- या आसनामुळे पाठीचा कणा लवचिक बनतो व पोटातील स्नायूंना व अवयवांना व्यायाम मिळतो.
- पाठीच्या कण्याच्या नाड्यांचे मूळ व रक्त या आसनामुळे खेचले जाते. त्यामुळे त्यांचे कार्य सुरळीत चालू राहते.
- हे आसन पश्चिमोत्तासनास मदतरुप होणारे आहे.

# वाढदिवसाच्या



गायत्री वायडे



हृदय पाटील



ईश्वरी गजरे



सौरभ महाडिक



अनन्या बर्गे




मधू कदम




निरंतर बर्गे



अंश मोकाशी



हर्षिनी सवणे



अनंत किर्वे




वेदांत तोडकर



स्वराज ठबे



आदर्श जाधव




आराध्या हराळे

# हार्दिक शुभेच्छा



जान्हवी कामटे




विवेका पाटील



मयुर पाटील




हर्षवर्धन पाटील



स्वनिक नाईक



आस्था ठिक



देवांश बिरवटकर



भाविका चव्हाण




मान्यता पाटील




हार्दिक कातकर



सानवी शिंदे



ओम जाधव



विहान महाडिक

# वैज्ञानिक प्रश्नोत्तरे

**प्रश्न : फोर-जी तंत्र उत्तम का आहे ?**

**उत्तर :** फोर-जी ही बिनतारी सेवेची चौथी पिढी आहे. फोर-जी तंत्रात ओएफडीएमए (आर्थोगोनल फ्रिक्वेंसी डिव्हीजन मल्टीपल ॲक्सेस) च्या मदतीने नेटवर्कची सोय अधिक उत्तम झाली आहे. फोर-जी पूर्णपणे इंटरनेट प्रोटोकॉल आधारित सेवा आहे. यात व्हाइस, डाटा व मल्टीमीडिया समान वेगाने पाठवता व मिळवता येते.

तशा थ्री-जी तंत्रात, तंत्रज्ञानाचे जग बदलणाऱ्या साऱ्या सुविधा आहेत; परंतु प्रत्येक नवे तंत्र जुन्या तंत्राच्या त्रुटींच्या आधारावर तयार केले जात असते. असेच फोर-जी तंत्रात केले गेले आहे. फोर-जी तंत्राचा वेग १०० एमबीपीएस असून तो थ्री-जी पेक्षा ५० पट जास्त आहे. थ्री-जी वायरलेस नेटवर्कमध्ये ३८४ केबीपीएस ते २ एमबीपीएस वेगानेच डेटा पाठवला जाऊ शकतो. तसेच फोर-जी तंत्राची किंमत थ्री-जी तंत्रापेक्षा कमी आहे. थ्री-जी पेक्षा फोर-जी चा डाटा रेट जास्त आहे म्हणजेच डॉक्यूमेंट्स, फाईलसारखा डेटा पूर्वीपेक्षा अधिक वेगाने ट्रान्सफर करता येतो.

थ्री-जी तंत्र वाईड एरिया नेटवर्क कॉन्सेप्टवर काम करते ते फोर-जी तंत्र लोकल एरिया नेटवर्क आणि बेस स्टेशन वाईड एरिया नेटवर्कवर काम करते. फोर-जी मुळे युजरला क्वॉलिटी ऑडिओ व व्हीडिओ सुविधा उपलब्ध होईल.

**प्रश्न : फुले लाल आणि पाने हिरवी का दिसतात ?**

**उत्तर :** सूर्याच्या प्रकाशात इंद्रधनुष्याचे सर्व सात रंग उपलब्ध असतात परंतु जेव्हा लाल रंगाच्या फुलावर सूर्याची किरणे पडतात तेव्हा ते लाल रंगाच्या अवयवांना सोडून बाकी सर्व रंगाच्या अवयवांना अवशोषित करुन घेतले जाते. त्यामुळे आपल्याला लाल फूल लालच दिसते. हीच गोष्ट हिरव्या पानांविषयी असते. सूर्याची किरणे या पानांपासून हिरवा रंग म्हणजेच क्लोरोफिलचे रंग सोडून बाकी सर्व रंगांना अवशोषित करते.

**प्रश्न : दूध व फळे एकत्र का खाऊ नये ?**

**उत्तर :** बऱ्याच फळांमध्ये ती पिकली तरी आम्लाचा अंश असतो. दुधामध्ये आम्ल मिसळलं, की त्यातील प्रथिनांचे रेणू एकत्र येऊन एक घट्ट जाळं तयार करतात. त्यामुळे तो पदार्थ पचायला कठीण होतो. म्हणून दूध आणि फळं एकत्र करु नये; परंतु पूर्ण पिकलेली केळी, आंबा आणि सीताफळ यामध्ये आम्लाचा अंश कमी असतो. म्हणून केळ्याचे शिकरण, मँगो मिल्कशेक, सीताफळ मिल्कशेक हे पदार्थ चालू शकतात. त्यामुळे हे खाताना आवश्यक ती काळजी घ्यायला हवी. अन्यथा ती पचायला जड जातील.

कविता : सुरेश तिर्लोटकर

# प्रजासत्ताक दिन

पूर्व दिशेला क्षितिजावरती
रवी किरणे सोनेरी
प्रजासत्ताक दिवस उगवला
२६ जानेवारी ।।धृ।।

रात्र भयानक ती ओसरली
रम्य अशी ही प्रभात झाली
सुराज्याची लेऊन लाली
वंदे मातरम गरजू लागली
जिकडे तिकडे प्रभात फेरी ।।१।।

तिरंगा प्यारा उंच उभारुन
मानाने करु तयास वंदन
शूरवीरांना त्या आठवून
करु तयांनाही अभिवादन
ही देण तयांची खरी ।।२।।

एकत्वाने सारे राहू
भारत मातेचे गुण गाऊ
शूर शिपाई आपण होऊ
शक्ती सारी पणास लावू
प्रगतीची मारु भरारी ।।३।।



# परमात्म्याशी नाते आणि जागृती



जगातील प्रत्येक माणसाला प्रेरणा दिली जाते, की या एका परमात्म्याशी नाते जोडा. याच्याशी जोडल्यानेच जागृती प्राप्त होते आणि आनंदाचा अनुभव येतो. जर राम आणि रहिम एक आहेत वेगळे नाहीत, अशी समज आली तर झगडे समाप्त होतात. जर हा बोध झाला तर कोणत्याही भिंती बाकी राहत नाहीत. याप्रमाणे जर जीवनात व्यवहार केला तर एकत्व आणि बंधुभाव स्थापित होतो. मग प्रेमभावाला मजबूती मिळाली की वातावरण सुखद होते. अशाप्रकारचे क्षण आपल्या नशीबात आले आणि जीवनयात्रा सुखाने संपन्न झाली. ज्यांच्या जीवनात जागृती येते, ज्यांना सत्याचा बोध होतो ते स्वत: प्रभुशी जुडतात आणि इतरांनाही जोडले जातात.

स्वत: भेदभावाच्या भिंती पाडतात आणि दुसऱ्यांनासुध्दा प्रेरणा देतात. त्यानंतर त्यांना कबीरजींप्रमाणे राम आणि रहिम एक दिसायला लागतात. एकच प्रकाश सर्वांमध्ये आहे. नर असो अगर नारी ही दृष्टी प्राप्त होते. मग हरयाणवी, राजस्थानी, गुजराती, मारवाडी, पंजाबी किंवा अरबी, अमेरिकन असो सर्वांमध्ये या प्रभूचे रुप दिसू लागते. या धरतीवर जितके तंटे-बखेडे आहेत ते याच कारणाने आहेत, की ज्यांनी या सत्याचा, ज्ञानाचा, बोधाचा आधार घेतला नाही ते भ्रम-भ्रांतीने बध्द होऊन अज्ञानाच्या अंधारात चाचपडत आहेत. ते वास्तविकता जाणत नसल्यामुळे पिढ्यान्पिढ्या तिरस्काराच्या आगीत स्वत: जळत आहेत आणि दुसऱ्यांनाही जाळत आहेत. आजपर्यंतच्या सर्व गुरु-पीर-पैगंबरांनी हीच जागृती प्रदान केली आहे. माणसांना ठोकर लागू नये म्हणून तेच साधन बनले. त्यांनी कोणत्याही एका जातीसाठी नाही तर सर्व जाती-धर्मांसाठी प्रकाशाचा संदेश दिला कारण अज्ञानता, अज्ञान तोच आहे, अंधार तो अंधारच आहे.

**- बाबा हरदेवसिंहजी महाराज**

# निरनिराळ्या कॅलेंडर्सच्या गमतीजमती

**इजिप्त :** असे म्हणतात, की जशी इजिप्तची संस्कृती जगात सर्वात जुनी समजली जाते तसेच इजिप्तचे कॅलेंडरही सर्वात जुने मानले जाते. ते सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी प्रचलित झाले होते. या कॅलेंडरमध्ये ३० दिवसांचा महिना व १२ महिन्यांचे वर्ष होते. या कॅलेंडरचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे इजिप्तच्या लोकांनीच आठवड्याच्या रुपात काळाचा सर्वप्रथम वापर सुरु केला होता. इ.स.पू. ४०० मध्ये या अतिप्राचीन कॅलेंडरमध्ये सुधारणा करुन दर वर्षाच्या शेवटी ५ दिवस जोडण्यात आले होते. ज्यामुळे वर्ष ३६५ दिवसांचे झाले. त्यानंतर इ.स.पू. २३८ मध्ये पुन्हा सुधारणा करण्यात आली. पण लोकांनी ती जास्त मनावर घेतली नाही.

**रशिया :** रशियात १९१८ पर्यंत ५-५ दिवसांचे ६ आठवडे प्रत्येक महिन्यात असत. अशा बारा महिन्यांचे ३६० दिवसांचे वर्ष असे. त्यामध्ये ५ दिवस जोडून कॅलेंडर तयार केले जात असे. १९१८ पासून त्यांनी नव्या ग्रिगेरियन कॅलेंडरचा स्वीकार केला.

**ग्रीस :** प्राचीन ग्रीसमध्ये चांद्रवर्षावर आधारित कॅलेंडर प्रचलित होते. त्यामध्ये ३० दिवसांचा महिना होता व आळीपळीने तो २९ व ३० दिवसांचा असे. येथे आठवडा १० दिवसांचा होता. पुढे यामध्ये सुधारणा व विकास होत राहिला. आता येथेही ग्रिगेरियन कॅलेंडर वापरले जाते.

**अरब :** मुसलमानांचेही एक वेगळे कॅलेंडर आहे. त्याला हिजरी संवत म्हणतात. १६ ऑगस्ट ६२२ रोजी मोहम्मद पैगंबरांनी मक्केवरुन मदिनामध्ये हिजरत (प्रस्थान) केले. या घटनेप्रीत्यर्थ दुसरे खलिफा हजरत उमर यांनी हिजरत संवत सुरु केले होते. भारतात अकबराच्या शासनकाळात फसली वर्षाच्या रुपात मान्यता मिळाली होती.

**तुर्की :** तुर्कस्तानात सुरुवातीला हिजरी संवत प्रचलित होते, परंतु १९१७ पासून तिथे ग्रिगेरियन कॅलेंडरला मान्यता देण्यात आली.

**ब्रिटन :** इ.स. १७५१ पूर्वी इंग्लंडमध्येही नवे वर्ष २५ मार्चपासून सुरु होत असे, परंतु सुधारित व शुध्द ग्रिगेरियन कॅलेंडर लागू झाल्यानंतर तेथे जानेवारीपासून नव्या वर्षाची सुरुवात होऊ लागली.

**युरोप :** जगभर प्रचलित असलेल्या ग्रिगेरियन कॅलेंडरचा जन्म प्राचीन संस्कृतीचे केंद्र असलेल्या रोममध्ये झाला. त्यावेळी रोमवर धार्मिक पगडा जास्त असल्यामुळे या कॅलेंडरमधील अनेक महिन्यांची नावेही रोमन देवतांच्या नावावर आधारित आहेत.

❏❏❏

# हसा मुलांनो हसा

"डॉक्टर, डॉक्टर, मला ना असं वाटतं की मी पतंग आहे." बाळूकाका म्हणाले.

"पतंग ? मांजाचा ?" डॉक्टरांनी विचारले. "नाही.नाही. दिव्यावर झेपावणारा कीटक असतो ना, तो पतंग."

"ओह! पण मग तुम्ही माझ्यासारख्या एमबीबीएस डॉक्टरकडे येऊन काय उपयोग. तुम्हाला मानसोपचारतज्ज्ञाकडे जाण्याची गरज आहे."

"अहो मी मानसोपचारतज्ज्ञांकडेच निघालो होतो. वाटेत तुमच्या डिस्पेन्सरीचा दिवा चालू दिसला.... आपोआप इथे आलो!!!"

पोस्ट ऑफिसात आलेल्या जख्खड म्हाताऱ्या आजीला पाहून बंडूला माणुसकीचा उमाळा आला. "आजी काय मदत करु ?" त्यानं विचारलं.

आजीने एक आंतरदेशीय पत्र काढून त्याच्या हातात दिलं आणि तासभर त्याच्याकडून पत्र लिहून घेतलं.

"सर्वांना आशीर्वाद..." हां आजी! संपलं ना पत्र ? की अजून लिहायचंय काही ?

बारीक डोळे करुन पत्रावरुन नजर फिरवून आजी म्हणाल्या, "ताजा कलम लिही बाळा! अक्षरास हसू नये!!!"

चिंगी : बंड्या, तुला माहीत आहे का? विराटच्या लग्नाला म्हणे केवळ ५०च माणसं उपस्थित होती.

बंड्या : अगं एवढी माणसं तर आमच्याकडे लग्नामध्ये रुसलेली असतात.

वेड्यांच्या इस्पितळातील एक वेडा पत्र लिहीत होता. डॉक्टरांनी विचारले, "कोणाला पत्र लिहितोस ?"

"मला स्वत:लाच लिहितोय."

"अच्छा, काय लिहिलंय पत्रात ?"

"मला काय माहिती ? अजून मला पत्र कुठे मिळालेय ?"




बंडू : अगं, माझ्या आजीने आता पंचाहत्तराव्या वर्षी बॉयकट केलाय!
चिंगी : मग ती वेगळीच दिसत असेल की?
बंडू : हो ना! चक्क आजोबा!

चौखुरेगुरुजी फळ्यावरच्या सुविचाराकडे बोट करुन म्हणाले, “बाळांनो, नेहमी लक्षात ठेवा. जगात अशक्य असं काहीच नाही.”

बंड्या लगेच हात वर करुन म्हणाला, “गुरुजी, मग तुम्ही फेविकॉलच्या ट्यूबमधून सगळा फेविकॉल पिळून काढून तो पुन्हा ट्यूबमध्ये भरुन दाखवा ना!!!!”



एका ज्योतिषाने सदूकाकांचे भविष्य सांगितले,
ज्योतिषी : वयाच्या चाळीशीपर्यंत तुम्हाला खूप अपमान, मनःस्ताप व दुःख सोसावे लागेल.
सदूकाका : मग? पुढे?
ज्योतिषी : मग तुम्हाला त्याची सवय होईल.



चिंगी शाळेबाहेर उभ्या असलेल्या स्मार्ट पोलिसाकडे गेली.
चिंगी : माझ्या आईने सांगितले आहे, की पोलीस जनतेच्या सेवेसाठी असतात. संकटात मदत करतात. हे खरं आहे का?
पोलीस : हो बाळ, बरोबर आहे ते. आम्ही मदतीसाठी तयार असतो बोल. तुला काय मदत हवीय?
चिंगी : काही नाही. माझा डबा संपवायचा आहे. नाहीतर आई घरी गेल्यावर ओरडते. आज माझ्या डब्यात वांग्याची भाजी आहे.
पिंकी : आणि हो, माझा होमवर्क पण पूर्ण करुन द्या.



बाळूकाका : ओखी वादळाचा शोध कदाचित अशोक सराफ यांनी लावला असावा.
सदूकाका : अहो, ते कशावरुन?
बाळूकाका : वक्खा, विख्खी, ओखी

# शहाजी राजांची भेट

समर्थांची स्वारी परळीस असताना त्यांना त्यांच्या मातोश्रींकडून व श्रेष्ठांकडून म्हणजे मोठ्या बंधूंकडून पत्र घेऊन एक शिष्य आला. त्यात 'आपणास भेटून फार दिवस झाले तरी भेटून जावे' असा मजकूर होता. त्या पत्राला समर्थांनी फार प्रेमाने वंदन केले व शिष्याला दोन दिवस ठेवून घेऊन त्या पत्राचे उत्तर म्हणून पस्तीस ओव्या लिहून दिल्या. त्यामध्ये मातोश्रींचा गौरव केलेला होता व आपल्या दर्शनाला लवकरच येतो असा मजकूर होता.

एके दिवशी शिवाजी राजे समर्थांच्या दर्शनास आले असताना समर्थांनी त्यांना सांगितले, "आम्ही जांबेस जाऊन येतो. फार दिवस झाले मातोश्रींचे आणि श्रेष्ठांचे दर्शन झाले नाही."

राजांनी विनंती करत म्हटले, "मी ही येतो बरोबर" तेव्हा त्यांच्या पाठीवर हात ठेवत समर्थ म्हणाले, " राजे, आपण धर्मनीतिप्रमाणे राज्य करावे." शिवरायांनी त्यांची आज्ञा प्रमाण मानून ते रायगडावर परतले.

समर्थ जांबेला गेले. मातोश्रींना आणि बंधूंना भेटले. रामनवमीचा दहा दिवस उत्सव करुन पुन्हा सज्जनगडावर परतले.

एके दिवशी शिवराय नित्यनियमाने गुरुवारी समर्थांच्या दर्शनास आले व म्हणाले, "शहाजी महाराजांना आपल्या दर्शनासाठी यायचे आहे." शहाजी महाराज, जिजाबाई व व्यंकोजी महाराजांची आई तुकाबाई यांच्यासह दर्शनास आले. समर्थांनी सर्वांचा सत्कार करुन त्यांना ठेवून घेतले. रात्री समर्थांसोबत त्यांनी गप्पागोष्टी केल्या. शहाजी राजे म्हणाले, "शिवबा आपला आहे. श्रींच्याकृपेमुळे राज्य प्राप्त झाले तेही आपलेच आहे, त्याचे सर्वतोपरी संरक्षण करावे. अशी त्यांनी प्रार्थना केली."

त्यावर समर्थ म्हणाले, "शिवबा श्रींचा पूर्ण भक्त आहे. त्यांचा पराक्रम तुम्ही ऐकला असेलच, तुमच्या पूर्वपुण्याईने आणि देवीच्या कृपेने त्यांना नेहमी यशच येणार. आपण काही काळजी करु नये."

तीन दिवसांनी त्यांनी शहाजीराजांना निरोप दिला. शिवरायही रायगडावर परतले.

समर्थांची स्वारी एकदा फिरत फिरत मातापुरास गेली. तेथे दत्तात्रयाचे देवालय आहे. देवळात दहा ब्राह्मण अनुष्ठानास बसले होते. त्यांना समर्थांनी विचारले, तुम्ही येथे अनुष्ठान कोणत्या गोष्टींसाठी करत आहात?

ब्राह्मण म्हणाले, "दत्तांनी दर्शन द्यावे म्हणून बसलो आहोत."

❍ क्रमशः

कविता - महेंद्र पाटील (सफाळे)

# क्रांतिज्योती


अज्ञानरुपी अंधार छेदित, शिवरायांच्या भूमिवरती
मंगलदीप ज्ञानाचा घेऊनी, अवतरली क्रांतिज्योती

सहनशीलता त्याग समर्पण, दिव्य गुणांची सोज्वळ मूर्ती
आरुढ स्त्री साक्षर रथावर, प्रभू केशवा सम थोर सारथी

ऋण फेडण्या स्त्री जन्माचे, तोडीत शृंखला रुढी रीति
ज्ञानांजन घालूनी लोचनी, धवळिल्या मनी दीपज्योती

ज्ञानज्योतीचा प्रकाश लेवूनी, नारी फुले दरवळली जगती
हर्षाने आज रंग उधळते, स्त्री जातीची उज्ज्वल कीर्ती

विद्यादानी या गतीमान साथी, युगप्रवर्तक सावित्री पती
महत् कार्यातील अमर विभूति, शूद्र-दीनांचे कैवारी ज्योति



# किट्टी

चित्रांकन व लेखन : अजय कालडा








किट्टी, तू कविता लिहिलीस का ?
नाही, मी कविता वगैरे काहीच लिहिलं नाही. मॅडमने विचारले तर वही घरी विसरले म्हणून सांगेन.
सर्व मुलांनी आपापल्या वह्या उघडा. काल मी जी कविता लिहायला सांगितली होती ती सर्वांनी लिहिली का ?
बंडू, तू लिहिलेली कविता वाच पाहू.
मॅडम, पाऊस आला सर-सर-सर......


किट्टी, मस्ती करु नकोस. बंडूची कविता नीट लक्ष देऊन ऐक.
पण मॅडम मी कवितेची वही तर घरी विसरले आहे.
चल किट्टी आता तुझी कविता वाचून दाखव.
किट्टी, तुला तुझ्या कवितेच्या काही ओळी माहीत असतील त्या बोलून दाखव.
पाऊस...पाऊस.... पाऊस. मॅडम , पुढे आठवत नाही.


मॅडम, मी माझी कविता ऐकवू का ?
चल ठीक आहे, तुझी कविता ऐकव.
बरं झालं, आज चिंटूमुळे माझा मार चुकला. यापुढे मी माझं काम वेळेत पूर्ण करेन आणि कोणाची थट्टा करणार नाही.


हर्षित

आरोही


ओम

सोहम


सार्थक


रिधिमा


सिद्धी व तेजस


विधी



# मनाची उभारी

(चेन्नईतल्या मूक-बधिरांसाठी असलेल्या बालविद्यालयाच्या चाळिसाव्या वर्धापनदिनानिमित्त विद्यार्थ्यांशी केलेला संवाद
- १२ फेब्रुवारी २०१०)

चित्रा आणि मुकुंदन यांना ऑक्टोबर १९८५ साली पहिलं मुल झालं. तिचं नाव पवित्रा. दिलेल्या तारखेच्या एक महिना आधीच ती जन्मली होती. ती जन्मल्यावर लगेचच असं लक्षात आलं, की तिला जन्मजात हृदयाची समस्या आहे. ती जेव्हा तीन महिन्यांची झाली, तेव्हा तिच्या हृदयावर शस्त्रक्रिया केली. ती एक वर्षाची झाल्यावर तिच्या वडिलांना तिला ऐकण्यातही काही अडचणी असाव्यात असा संशय आला. लहान मुलांच्या डॉक्टरशी बोलल्यानंतर, त्यांना कान, नाक, घसा तज्ज्ञाकडे पाठवण्यात आलं. त्या तज्ज्ञाने त्यांना ऑडोओलॉजिस्टकडे पाठवलं. काही भेटी घेतल्यानंतर, असं लक्षात आलं, की तिला मेंदूतल्या काही बिघाडांमुळे बहिरेपणा आला आहे, जी गंभीर समस्या होती. तिला ऐकण्यासाठीचं मशीन देण्यात आलं.

पवित्रामध्ये रुबेला या जर्मन गोवराचीही लक्षणं दिसली होती. बाळंतपणाच्या सुरुवातीला तिच्या आईला रुबेला झाला होता. ऑडिओलॉजिस्टच्या शिफारशीनुसार, पवित्रा मार्च १९८७ साली बालविद्यालयात दाखल झाली, तेव्हा ती एक वर्ष पाच महिन्यांची होती.

बालविद्यालयात पवित्रा खिशात मावणारं ऐकण्याचं मशीन घालायची. नऊ किलो वजन भरणाऱ्या त्या मुलीला दोन ऐकण्याची मशीन सांभाळणं, हे खूपच कठीण काम होतं. सरस्वती नारायणस्वामी या पवित्राच्या पहिल्या



शिक्षिका होत्या. पवित्रा खूपच हुशार होती, ती कष्ट करायला मागे नसायची आणि तिची वागणूकही चांगली होती. तिचे आई-वडीलही मदतीला तयार असायचे आणि ते कष्ट करायला तयार होते. सुरुवातीला शाळेत मुलाने दिवसाला एक तास हजर असणं आणि त्यासोबत त्याची आईदेखील सोबत असणं आवश्यक होतं. तिच्या आईला कौन्सेलिंग करुन तिच्या बाळात असलेल्या बहिरेपणाला एक आव्हान म्हणून घ्यावं असं समजावण्यात आलं आणि तिच्या मुलीबद्दल तिने पाहिलेली स्वप्नं सोडू नयेत असंही सांगण्यात आलं.

लवकरच, तिच्या शाळेचे तास वाढले. वल्ली अन्नामलाई आणि महालक्ष्मी सुंदर यांनीही शिक्षकांच्या टीममध्ये सहभाग घेतला. पवित्राने झपाट्याने प्रगती केली आणि ऐकण्याची मूलभूत कौशल्यं आत्मसात केली. आवाज असणं आणि तो नसणं यातला फरक ती ओळखू लागली, आवाज कुठल्या स्त्रोतातून आला असेल हे ओळखू लागली आणि तिने ऐकलेले आवाज ओळखून त्यातला फरक ओळखू लागली. वस्तूंना दिलेल्या नावांनुसार ती वस्तू ओळखू लागली, रंग आणि आकार यावरुन गोट्या वेगवेगळ्या करु लागली, आकारांनुसार वस्तू वेगळ्या करु लागली, आणि दिलेल्या सुचनेनुसार मणी ओवू लागली. पवित्रा जेव्हा अडीच वर्षांची झाली होती, तेव्हा तिला साध्या साध्या आज्ञा आणि छोटी छोटी वाक्यं करता येऊ लागली होती. तिला चित्रांची पुस्तकं आवडायची. ती आनंदात होती आणि मोठ्या खुशीने ती शाळांच्या कार्यक्रमात भाग घ्यायची.

त्यानंतर पवित्राला मॉन्टेसरीत टाकलं गेलं आणि तिला वाचन, लेखन व आकडेमोड या गोष्टी करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत गोष्टींची ओळख करुन देण्यात आली. ती शब्द आणि चित्र जुळवू लागली, योग्य चित्राला वाक्य जोडू लागली आणि अभ्यासातही चांगलं काम करु लागली. ती अस्खलित बोलू लागली आणि विचारलेल्या प्रश्नांना उत्तरं देऊ लागली. सहजपणे संवादात भाग घेऊ लागली. एप्रिल १९९१ मध्ये बालविद्यालयातून अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, पवित्राला चेन्नईतल्या चिन्मया विद्यालयात पहिलीत घालण्यात आलं.

त्या सर्वसामान्य शाळेमध्ये असं लक्षात आलं, की अपंग नसलेल्या इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत पवित्राची वाचन-लेखन कौशल्यं ही खूपच जास्त विकसित झालेली होती. तिची उत्तम प्रगती होत होती आणि तिच्या वर्गात ती कायमच पहिल्या येणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी एक येत राहिली. तिची आई तिच्या शाळेच्या, तसंच बालविद्यालयाच्या कायम संपर्कात असायची. जेव्हा केव्हा तिच्या मनात काही प्रश्न पडायचे, तेव्हा तेव्हा तिला बालविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांकडून त्याची उत्तरं मिळायची.

पवित्राचं वजन कायमच तिच्या वयापेक्षा कमी होतं. ती बालपणापासूनच अनेक आजारावर मात करत आली होती. एकंदरीत पवित्रामध्ये शिकण्याची जिद्द आणि चिकाटी दिसून येत होती.

❑❑❑




प्रख्यात न्यायाधीश महादेव गोविंद रानडे यांच्या लहानपणीची ही गोष्ट आहे.

शाळेत जाणाऱ्या छोट्या महादेवाला आई रोज काही ना काही खाऊ डब्यात घालून द्यायची. एकदा महादेव म्हणाला, "आई! मला खाऊ थोडा अधिक देत जा! माझा मित्रही माझ्यासोबत डबा खातो." दुसऱ्या दिवशी आईने त्याच्या डब्यात दोन लाडू दिले. मधल्या सुटीत महादेवने डबा उघडला. त्यात दोन लाडू होते. एक छोटा आणि दुसरा मोठा. महादेवने मोठा लाडू मित्राला दिला आणि छोटा लाडू स्वत: खाल्ला.

घरी आल्यावर आईने विचारले, "बाळ, तुझ्या मित्राला तू कोणता लाडू दिलास? छोटा की मोठा?" त्यावर महादेव म्हणाला, "आई, तूच मला शिकवलंस ना, की चांगली गोष्ट नेहमी दुसऱ्याला द्यावी, त्याप्रमाणे मोठा लाडू मित्राला दिला आणि छोटा लाडू मी खाल्ला."

खरं तर आईला आपल्या लाडक्या महादेवाची परीक्षा घ्यायची होती. त्याचा स्वभाव जाणून घ्यायचा होता. म्हणून तिने मुद्दामच लहान आणि मोठा लाडू डब्यात दिला होता. महादेव तिच्या या परीक्षेत शंभर टक्के उत्तीर्ण झाला होता. ती आनंदाने म्हणाली, "शाब्बास बाळ! दुसऱ्याला जास्त देण्यात व स्वत:ला कमी घेण्यात आनंद असतो. हा आनंद काही वेगळाच असतो."

"आई, आज त्या आगळ्या आनंदाचा मी अनुभव घेतला." महादेवच्या या उत्तराने आईची मनोमन खात्री पटली, की भविष्यात हा कोणी तरी महान बनेल. मोठे नाव कमवेल आणि खरोखरच हाच महादेव पुढे प्रख्यात न्यायाधीश आणि थोर समाजसुधारक न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे म्हणून प्रसिध्दीस आला.

तात्पर्य, वाटून खाणे ही आपली संस्कृती आहे.

❐❐❐




# ब्राह्मोस चा सुखोईतून लक्ष्यभेद

भारतीय लष्कराच्या ताफ्यातील महत्त्वाचे अस्त्र असलेल्या ब्राह्मोस या सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्राने हवेतूनही मारा करत लक्ष्यभेद करण्याची आपली क्षमता काही दिवसांपूर्वी सिध्द केली. हवाई दलाच्या सुखोई-३० एमकेआय या लढाऊ विमानातून हे क्षेपणास्त्र डागण्यात आले आणि त्याने बंगालच्या उपसागरातील ठरलेल्या लक्ष्याचा अचूक वेध घेतला भारताने हवेतून ब्राह्मोस डागण्याची चाचणी प्रथमच घेतली असून, या हल्ल्यामुळे शत्रूवर मारा करण्याची भारतीय हवाई दलाची क्षमता अनेक पटींनी वाढली आहे.

सुमारे २९० किमीचा मारक टप्पा असलेले ब्राह्मोस क्षेपणास्त्र आता जमीन, पाणी आणि हवेतूनही डागता येणार आहे. हे जगातील वेगवान सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्र मानले जाते. या क्षेपणास्त्राची जमीन आणि जहाजावरुन मारा करणारी आवृत्ती यापूर्वीच भारतीय सैन्यदलांमध्ये दाखल करण्यात आली आहे. प्रथमच विमानातून डागण्यात आलेल्या ब्राह्मोस क्षेपणास्त्राच्या चाचणीमुळे इतिहास घडला आहे असे संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे.

ब्राह्मोस एएलसीएम क्षेपणास्त्राचे वजन २.५ टन असून, सुखोई विमानावर तैनात केलेले हे सर्वात वजनदार शस्त्र आहे. भारताच्या डीआरडीओ आणि रशियाच्या एनपीओ मशिनोस्त्रोयेनिया (एनपीओएम) या संस्थांनी संयुक्तपणे ब्राह्मोस क्षेपणास्त्राची निर्मिती केली आहे.

स्वयं संरक्षणमंत्री तसेच डीआरडीओ चे अध्यक्ष यांनीदेखील टीम ब्राह्मोस, शास्त्रज्ञ आणि अभियंत्यांचे अभिनंदन केले.

❑❑❑

# सामान्य ज्ञान



१) अलीकडेच मुंबईला कोणत्या वादळाचा तडाखा बसणार होता ?

अ) रॉकी ब) जॉकी क) ओखी ड) खोकी

२) सतरा वर्षानंतर 'मिस वर्ल्ड' हा किताब कोणाला मिळाला ?

अ) ऐश्वर्या राय ब) मानुषी छिल्लर क) प्रियंका चोप्रा ड) दिया मिर्झा

३) जम्मू हे शहर कोणत्या नदीकिनारी वसले आहे ?

अ) रावी ब) तावी क) झेलम ड) चिनाब

४) सध्या युध्दखोर देश म्हणून कोणत्या देशाकडे पाहिले जाते ?

अ) चीन ब) जपान क) रशिया ड) उत्तर कोरिया

५) साक्षी मलिक ही खेळाडू कोणत्या खेळाशी संबंधित आहे ?

अ) कुस्ती ब) तिरंदाजी क) बॉक्सिंग ड) वेटलिफ्टिंग

६) पुरुषांचा पहिला वर्ल्ड कप सामना १९७५ साली कोठे झाला ?

अ) भारत ब) ऑस्ट्रेलिया क) द.आफ्रिका ड) इंग्लंड

७) महाराष्ट्र राज्यातील सर्वाधिक लांबीची नदी कोणती ?

अ) कृष्णा ब) कोयना क) पूर्णा ड) गोदावरी

८) पोस्टाची कार्डे व पाकिटे छापण्याचा कारखाना महाराष्ट्रात कोठे आहे ?

अ) नाशिक ब) पुणे क) नागपूर ड) मुंबई

९) शारीरिक शिक्षण दिन कोणत्या दिवशी साजरा केला जातो ?

अ) १ जानेवारी ब) २१ जानेवारी क) २४ जानेवारी ड) ३० जानेवारी


१०) रामायणातील लक्ष्मण, राजा जनक यांचा नात्याने कोण होता ?

अ) पुतण्या ब) जावई क) भाचा ड) कोणीही नाही

उत्तरे इतरत्र

पक्षीजगत





# हिमालयातील कस्तुरी

हिमालयाच्या पर्वतरांगा आणि पायथ्याच्या प्रदेशात आढळणारी ही कस्तुरी पक्ष्याची प्रजात. या पक्ष्याला इंग्रजीत ब्लॅक बर्ड असं म्हणतात. या पक्ष्याच्या काही प्रजाती भारतातील इतर क्षेत्रांतही आढळतात.

साधारणतः २३ ते २९ सेंटीमीटर लांबी असणाऱ्या या पक्ष्याचं वजन ८० ते १२५ ग्रॅम इतकं असतं. हा सुबक पक्षी तपकिरी-पिवळसर रंगाचा असतो. नर व मादीमध्ये बराच फरक दिसून येतो. नर विशेषतः काळ्या-तपकिरी रंगसंगतीत दिसतो, तर मादी तपकिरी-पिवळसर रंगाची असते. विशेष म्हणजे नराच्या डोळ्याभोवती पिवळी वर्तुळं असतात. दोघांमध्ये पिवळ्या रंगाची चोच आणि काळे टपोरे डोळे हे साम्य मात्र दिसून येतं. हा पक्षी बंदुकीच्या गोळीसारखा, ची-ची शीळ घालत सुसाट उडताना दिसतो. विशेषतः पाण्याच्या ठिकाणी निवांत बसून, पाण्यातील हालचाल निरखत, बराच वेळ विसावलेला कस्तुरी हमखास दिसतो.

या पक्ष्याची शारीरिक क्षमता अफाट असते. यामुळेच तो उंच पर्वतीय तग धरुन राहू शकतो. पानगळीची आर्द्र जंगलं, सदाहरित मध्यम आकाराची जंगलं आणि दाट बांबूच्या जंगलांतही या पक्ष्याचं वास्तव्य दिसून येतं. फळं, कीटक, बारीक किडे, अळ्या, गांडूळ हे या पक्ष्याचं मुख्य खाद्य आहे.

एप्रिल ते जून हा याचा प्रजननाचा काळ असतो. नर व मादी सहसा एकाच ठिकाणी वर्षभर राहतात आणि झाडावर फांदीच्या कडेला चिखल थापून सुबक चाटीच्या आकाराचं घरटं तयार करतात. या काळात मादी निळसर-हिरवट रंगाची तीन ते पाच अंडी घालते. मादी एकटीच १२ ते १४ दिवस ही अंडी उबवते. यानंतर तीन आठवड्यांनी पिल्लं बाहेर येतात आणि १५-२० दिवसात उडण्यास सक्षम होतात.

❒ संग्राहक : अंकित जाधव



कथा

# खोट्याच्या माथी सोटा

एक निर्धन मनुष्य नेहमी धनाच्या चिंतेत असायचा. आपल्याकडे खूप पैसा असावा असे त्याला वाटत होते. कष्ट करुन आपण कधीच श्रीमंत होणार नाही त्यापेक्षा एखाद्या महान तपस्वीची सेवा केल्यास आपले नशीब बदलेल, असे त्याला वाटत होते.

त्यामुळे तो कष्ट करण्याऐवजी साधू-महंताच्या शोधात निघाला. त्या भटकंतीत त्याचे अर्धे आयुष्य निघून संपून गेले. तो निर्धन पन्नाशीचा झाला तेव्हा त्याला एक तपस्वी भेटला. निर्धन त्याच्या सेवेत राहिला. दोन-तीन वर्षे सेवा झाली.

एका मध्यरात्री तो तपस्वी म्हणाला, तुम्ही माझी सेवा मनोभावे केलीत. पण मनात हेतू ठेवून. तुमच्या मनातला हेतू मी ओळखला आहे. मी तुम्हाला पारसमणी देतो. हा पारसमणी ज्या

ज्या लोखंडी वस्तूला लावाल त्या वस्तू सोन्याच्या बनतील. पण यासाठी अट अशी आहे, की येथून पन्नास मैल दूर जाऊन तुम्ही लोखंड गोळा करुन आणावे व एका रात्रीत सर्व लोखंडाचे सोने करावे. हा पारसमणी घ्या. परवा मध्यरात्री हा पारसमणी आपोआप माझ्याकडे परत येईल.

तपस्व्याचे बोलणे ऐकून निर्धन आनंदला व त्याने तो पारसमणी हातात घेऊन पाहिला बोराएवढा चमकदार असा तो मणी होता. पारसमणी घेऊन निर्धन माणूस धावत सुटला कारण तपस्वीसह तो जंगलात राहत होता. पन्नास मैल धावताना तो निर्धन कमालीचा थकला व त्याला झोप आवरेना. पारसमणी धोतराच्या गाठीत बांधून तो एका गावच्या पाराखाली आडवा झाला व घोरु लागला.

त्यात त्याचा अर्धा दिवस गेला. तत्पूर्वी अर्धा दिवस तो पळत होता. म्हणजे एक दिवस वाया गेला. जेव्हा त्याला जाग आली. तेव्हा खूप भूक लागली होती. एका भटारखान्यात तो भाकऱ्या भाजायला राहिला. तेव्हा अर्धा दिवस काम केल्यावर त्याला दोन भाकरी व थोडी भाजी खावयास मिळाली. म्हणजे दिड दिवस यातायात करण्यातच वाया गेला.

मग एक सबंध दिवस फिरुन त्याने बैलगाडी भरेल इतके लोखंड गोळा केले. त्याने एक गाडीवान शोधला व गाडीवानाला म्हणाला, तुझ्या बैलगाडीतून हे लोखंड घेऊन माझ्या गावी चल. मी तुझ्या बैलगाडीची दोन्ही चाके सोन्याची करुन देईन.

गाडीवानाला वाटले हा कोणीतरी मोठा व्यापारी असावा आणि त्याच्याकडे अमाप धनदौलत असावी. गाडीवानाने सगळे लोखंड गाडीत भरले व निर्धनाला बैलगाडीत बसवून निघाला. दिवसभराच्या श्रमाने निर्धनाला गाढ झोप लागली. गाडीवानाने कपडे चाचपले. त्याच्या हाती पारसमणी लागला. गाडीवानाने तो कमरेला खोचला. मग त्या निर्धनाला अलगद उचलून एका झाडाखाली ठेवले व लोखंडासह बैलगाडी घेऊन तो पसार झाला. निर्धनाला जाग आली. पाहतो तो काय गाडीवान लोखंडासह पसार आणि कमरेला पारसमणीही नाही. तपस्व्याच्या सांगण्याप्रमाणे ती तिसऱ्या दिवशीची मध्यरात्री होती. निर्धन रडत धावत तपस्व्याकडे आला. तपस्व्याच्या हातात पारसमणी होता. निर्धन म्हणाला, मी खूप धडपडलो. अखेरच्या क्षणी मला झोप लागली व पारसमणी आणि गाडीभर लोखंड घेऊन बैलगाडीचा गाडीवान पसार झाला.

पारसमणी परत माझ्याकडे आला आहे. याचा मला काही उपयोग नाही कारण मोहमाया मला भुलवू शकत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे तुझ्या कर्मातच धन नाही. तू येथून परत जा. निर्धन रडत रस्त्याला लागला. वेळेच्या आधी आणि कर्मापेक्षा अधिक कोणाला काहीच मिळत नसते. कष्टाला जो टाळतो तो निर्धन राहतो, असे जाणकार म्हणतात.

❐❐❐

माणूस किती किमती कपडे वापरतो यावरुन त्याची किंमत होत नसते, तो इतरांची किती किंमत करतो यावरुन त्याची किंमत ठरत असते.

# चित्र काढा आणि रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१) क
२) ब
३) ब
४) ड
५) अ
६) ड
७) ड
८) अ
९) क
१०) ब

## शब्दकोडे १६२

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ | म | रा | व | ती | | मी |
| रु | | ष्ट्र | | स | हा | रा |
| णा | | प | ती | | पू | |
| च | पा | ती | | सा | स | रा |
| ल | | | भी | म | | ज |
| | भ | व | | वे | | स्था |
| | र | | अं | द | मा | न |
| स | त | यु | ग | | द्री | |

|| तू ही निरंकार ||

ना चिंता ही, ना भय ही...
केवळ ''सद्गुरू माता सविंदर हरदेवजी महाराज '' की जय हो....!

सर्वांसाठी... सर्वकाही...
एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची
खास सोय !



शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

महालक्ष्मी



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

मनपसंत साड्या । सुटींग-शर्टींग । ड्रेस मटेरियल
चिल्ड्रन्स वेअर । मेन्स् वेअर । होजिअरी विभाग । मॅचिंग सेंटर

सद्गुरू की निगाहे करम एक अगर पड जाये,
मुक्कदर फिरसे लिखने को खुदा मजबूर हो जाये...

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)

फोन नं. : 9766727262

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2016-2018
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2018
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

।। एक तू ही निरंकार ।।



जनार्दन एच्. पाटील
झोनल प्रमुख-नाशिक क्षेत्र

कार्यालय : (०२५०) २५२७३२० / २५२७७४६
वेबसाईट : www.vijayaengineeringworks.com
ई-मेल : rajindustries2010@yahoo.in
janardanpatil6500@gmail.com

मे. विजया इंजिनिअरींग वर्क्स
मॅन्यु : स्पेशालिस्ट प्लास्टिक इंजेक्शन मोल्ड
(घेर ओरम टाईप डाईज)

मे. राज इंडस्ट्रीज
मॅन्यु : फार्मास्युटिकल्स कॅप्स (कोलॅप्सीबल आणि लॅमी ट्युब)
आणि पेस्टीसाईड पॅकेजींग



बाबाजी कन्स्ट्रक्शन कं.
वन रुम किचन, टू रुम किचन फ्लॅट आणि दुकानाचे
गाळे तसेच इंडस्ट्रीयल गाळे उपलब्ध
गाळा नं.१,४,६-८ महावीर इंडस्ट्रीयल इस्टेट, नारींगी फाटा,
विरार (पूर्व), ता. वसई, जिल्हा - ठाणे. पिन ४०१३०३. (महाराष्ट्र)

जनार्दन हा. पाटील
राकेश ज. पाटील

धन निरंकार !